CMYK
सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | रविवार, ३ मे २०२६ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com


# यंदाही ‘बारावी’च्या परीक्षेत मुलांपेक्षा मुलीच ठरल्या भारी




## ● सोलापूर जिल्ह्याचा निकाल ८४.८९ टक्के ● पुणे विभागाचा निकाल ९०.९८ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता ‘बारावी’च्या परीक्षेत मुलांपेक्षा मुलीच भारी ठरल्याचे निकालावरुन दिसून आले. सोलापूर जिल्ह्याचा निकाल ८४.८९ तर पुणे विभागाचा निकाल ९०.९८ टक्के इतका लागला.

सोलापूर जिल्ह्याचा निकाल राज्याच्या सरासरीपेक्षा काहीसा कमी राहिला आहे. सोलापूरमध्ये एकूण ५७ हजार ३४६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५६ हजार ५५९ विद्यार्थी परीक्षेला बसले आणि ४८ हजार ०१६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विविध शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी समाधानकारक यश मिळवले. सोलापूर जिल्ह्याचा शाखानिहाय निकाल याप्रमाणे; विज्ञान ९५.५२ टक्के, कला ७२.८५ टक्के, वाणिज्य ८३.६६ टक्के. शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही चांगले यश मिळवले आहे. पुणे विभागात एकूण १ लाख ४० हजार २९५ विद्यार्थी नोंदणीकृत होते. त्यापैकी १ लाख ३९ हजार १७० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील १ लाख २६ हजार ६२५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्याने पुणे विभागात अग्रेसर राहिला.



### नियोजनबध्द अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे पाठबळ

मुलींनी यंदाही सातत्यपूर्ण कामगिरी करत गुणवत्ता सिध्द केली आहे. नियोजनबध्द अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे पाठबळ यामुळे विद्यार्थ्यांनी यशाचे शिखर गाठल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

### विद्यार्थी घेतील अधिक उंच भरारी

यंदाचा बारावीचा निकाल समाधानकारक ठरला. मुलींचीच बाजी हे चित्र पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. भविष्यातही विद्यार्थी अधिक उंच भरारी घेतील, असा आशावाद माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी व्यक्त केला.

### पालकांनी वाटले पेढे

बारावी परीक्षेचा निकाल हाती येताच यशस्वी विद्यार्थ्यांच्या पालकांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला. यानिमित्ताने सोलापूर शहर, जिल्ह्यातील मिठाई दुकानांमध्ये मोठी गर्दी दिसून आली. यशस्वी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



## कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयचा १२ वी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचा १२ वी बोर्ड परीक्षेचा निकाल ८८.४४ टक्के लागला, या परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. आर्टस् शाखेचा ७२.३३, कॉमर्स शाखेचा ८८.६२, सायन्स शाखेचा ९६.८९ तर एमसीव्हीसी शाखेचा ९२.०० टक्के निकाल लागला आहे. कनिष्ठ महाविद्यालयात पेद्दी मंजुनाथ जयप्रकाश याने ८१.००, यनगंटी देवेंद्र लक्ष्मण याने ७५.८३ तर शेरला अक्षरा रमेश हिने ७२.३३ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक येण्याचा मान मिळविला. अनिता चतराराम पटेल हिने मानसशास्त्र विषयात ९५ व कॉमर्समध्ये यनगंटी देवेंद्र लक्ष्मण याने वाणिज्य संघटनमध्ये ९२ गुण मिळविले. संस्थेचे अध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम व विश्वस्त श्रीधर चिट्याल यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समितीचे अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर आदींनी अभिनंदन केले.




## आर्किड कॉलेजचे उल्लेखनीय यश

सोलापूर : एचएससी बोर्ड फेब्रुवारी २०२६ परीक्षेमध्ये नागेश करजगी ऑर्किड ज्युनिअर कॉलेजने उल्लेखनीय यश संपादन केले. श्रेया संजय मसाळ हिने ८५.५०% घेऊन प्रथम क्रमांक मिळविला, रौनक निर्भय राज याने ८५.१७% घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला.

गौरांग गणेश मामड्याल ८२.८३%, स्नेहा सुर्यकांत गांगडे ८२ %, आर्यन दीपक सुरवसे ८१.३३%,जिया सुमीत कांकरिया ८१%, शुभम राजू आडम ८०.६७%, अर्शप्रीती मधुकर ओव्हाळ ८०%, तेजस्वी शिवराज मोने ८०% यांनी गुण मिळवून यश संपादन केले आहे.

संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार करजगी, सचिवा वर्षा विभूते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्य स्मिता कुलकर्णी, प्राचार्या रुपाली हजारे, शाळेच्या मार्गदर्शिका मीना पारखे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## नेताजी महाविद्यालयाचा ९०.२७ टक्के निकाल

सोलापूर : एमआयडीसी परिसरातील नीलम श्रमजिवी नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९०.२७ टक्के इतका लागला. विज्ञान शाखेचा १०० %, वाणिज्य शाखेचा ९०.३८% तर कला शाखेचा ८०.४३ टक्के इतका निकाल लागला.

विज्ञान शाखेतून विजयालक्ष्मी देगील (७१.३३%),आश्रित म्हेत्रे (६८.५०%), संजना माळी (६५.३३ %) गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले. वाणिज्य शाखेतून आयेशा मकानदार (६७.७०%), संजना गडगी (६६.१७%), माया गडदे(६५%) गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले. कला शाखेतून अंकिता खोकले (७१.१७%), साईराम दासरी (६४.६७%), सुमा मठ(६३.८३%) गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले. प्रा.अमरनाथ दुस्सा, प्रा.दिपक नरोणे, प्रा.महेश नराल, प्रा.शांतेश करजगी, प्रा.चंद्रशेखर पाटील,प्रा.अनिल अंबारे, प्रा.अंगद तोरणे, प्रा.गीता चव्हाण, प्रा.राजश्री स्वामी, प्रा.प्रज्ञा भरमशेट्टी, प्रा.विद्या चिक्काळे आदी प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार, प्राचार्य रविशंकर कुंभार, माजी प्राचार्य विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदींनी अभिनंदन केले.



## ग्लोबल व्हिलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के

सोलापूर : कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज ज्युनिअर कॉलेज, बोरामणी (ता.दक्षिण सोलापूर) यांचा इयत्ता बारावीचा निकाल यंदाही शंभर टक्के लागला असून सलग अकराव्या वर्षी ही उज्वल परंपरा कायम राखण्यात महाविद्यालयाला यश आले आहे. विज्ञान शाखेत पार्थ प्रकाश कल्याणी याने ८७.००, जान्हवी सागर महिंद्रकर हिने ८६.३३, मोईन अप्पालाल खुरुसे याने ८५.६७, आश्मित सुनील हंद्राळमठ याने ८५.०० तर अरिजीत केयूर शिर्सी याने ८४.८३ गुण मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढवला. या परीक्षेस महाविद्यालयातील एकूण ७२ विद्यार्थी बसले होते व सर्व ७२ विद्यार्थी उत्तीर्ण होत १०० टक्के निकालाची परंपरा अबाधित राखण्यात यश मिळाले. त्यापैकी २७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह, २६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. प्राचार्या आसमा नदाफ, प्रा.डॉ.अविनाश पाटील, मल्लिनाथ जळकोटे, प्रा. आप्पासाहेब गुगले, प्रा.राहुल काळे, प्रा.प्रियांका माने आदींचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष डॉ.उमाकांत चनशेट्टी, सचिवा संगिता शहा, प्रा.अनिकेत चनशेट्टी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शांती ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या विद्यार्थ्यांचे यश

सोलापूर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या बारावीच्या परीक्षेत संतोषनगर, विजापूर रोड येथील शांती ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सने आपले यशाचे सातत्य टिकवून ठेवले आहे. या कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला असून सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत गुण मिळवून यश संपादन केले आहे.

कॉलेजमधील प्रथम तीन क्रमांक पटकावलेले विद्यार्थ्यांची नावे याप्रमाणे; जोजारे पुर्वा ८३.६७ टक्के (प्रथम) गंभीरे स्नेहा ८३.३३ टक्के (द्वितीय) काबरा यश ८१.५० टक्के (तृतीय) संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, प्राचार्य रजुला मॅक आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## ए.डी. जोशी ज्यु. कॉलेजचा १२ वी परीक्षेत

### ● १०० टक्के निकालाची परंपरा कायम ●

सोलापूर : महाराष्ट्र राज्य उच्चमाध्यमिक परीक्षेचा इ. १२ वी चा निकाल जाहीर झाला. या परीक्षेत ए.डी. जोशी ज्यु. कॉलेजचा ऋतुजा राजू निमगिरे ८७.०० % प्रथम आली.जय शिवशरण मुळगे ८५.६७% द्वितीय क्रम ांक नचिकेत उमेश बाबानगरे ८४.६७ % तृतीय क्रमांक गुण मिळविला.

तसेच प्रांजली भैरू माळी ८४.५० % चौथी क्रमांक गुण प्राप्त. राहिन बजलुर रेहमान शेख ८३.६७% गुण मिळवून पाचवी आली तसेच अनुष्का कृष्णा रेड्डी ८२.३३%, नेहा विशाल परदेशी ८१.१७% व मृण्मयी प्रमोद कुलकर्णी हिस ८०.००% गुण मिळाले महाविद्यालयातील एकूण २१० विद्यार्थी प्रविष्ट झाले असून सर्व विद्यार्थी उत्कृष्ट रित्या उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला.

याचबरोबर कै. अलकनंदा जोशी ज्युनिअर कॉलेजचाही शंभर टक्के निकाल लागला आहे. संस्थेचे अध्यक्ष प्रा. ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी, प्राचार्य प्रविण देशपांडे आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.











# जग मे बुद्ध का नाम है, यही भारत की शान है !

## सोलापुरात बुध्द जयंतीनिमित्त मिरवणूक उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे-**

जग मे बुद्ध का नाम है, यही भारत की शान है ..जय भीम... असा जयघोष करत बुद्ध जयंती निमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सोलापूर शहरात मंगलमय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. सजवलेल्या आकर्षक रथातून तथागत गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली.

माता रमाबाई आंबेडकर नगर येथील धम्म गंध बुद्ध विहार येथे पुष्पांजली व बुद्ध वंदना घेण्यात आली. शहराध्यक्ष अमित गायकवाड यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी समता सैनिक दलाने मानवंदना दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून या मिरवणुकीस प्रारंभ झाला. प्रारंभी जिल्हा अध्यक्ष सत्यजित जानराव, जिल्हा सरचिटणीस बाबासाहेब क्षीरसागर, शहराध्यक्ष अमित गायकवाड यांच्या हस्ते पूजन करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन या मिरवणुकीस प्रारंभ झाला.




त्यानंतर पुढे दानमय बुद्ध विहार येथे पुष्पांजली व वंदना घेण्यात आली. सम्राट चौक मार्गे मिलिंद नगर येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी येथे अभिवादन करण्यात आले. दरम्यान, नवी पेठेतील महापालिका शिक्षण मंडळ कार्यालय येथील (जुनी नगरपालिका) क्रांतीसूर्य ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहून पुढे पार्क स्टेडियम जवळील डॉ. आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डफरीन चौक मार्गे बुद्ध नगर फॉरेस्ट येथील डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलच्या प्रांगणातील बोधीवृक्षाचे पूजन करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन या मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. जिल्हा कोषाध्यक्ष दत्तात्रय सिद्धगणेश यांनी स्वागत केले तर जिल्हा सरचिटणीस बाबासाहेब क्षिरसागर यांनी आभार मानले. शिस्तबद्धरित्या शांततेत ही मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष दत्तात्रय सिद्धगणेश, जिल्हा महिला सरचिटणीस नंदा काटे, केंद्रीय शिक्षक अण्णासाहेब वाघमारे, जिल्हा संघटक धम्मरक्षिता कांबळे, रोहित जाधव, प्रा. जगन्नाथ शिंगे, धम्मपाल माने, यशवंत साबळे, बाबू रणखांबे, जनार्दन मोरे, विशाल ढेपे , सुमित डोलारे, राजेंद्र बाबरे, प्रसाद लांबतुरे, कमल सोनवणे, वैशाली जानराव, विशाल चतुर, राजेश सुरवसे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

दरम्यान, सोलापूर शहरात विविध सामाजिक संस्था, संघटनांच्या वतीने बुद्ध जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विविध ठिकाणी बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. सामुदायिक त्रिशरण पंचशील बुद्ध वंदना घेण्यात आली. खीर आणि लाडू वाटप करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी-१४२९

**येणें वेगळाले पणें पांडवा । करिती ज्ञानयज्ञु बरवा ।**
**जे न भेदती जाणिवा । जाणते म्हणऊनी ।।**

आतापर्यन्त भगवंतानी अविवेकी लोक व त्यांचे वर्तन आणि विवेकी लोक व त्यांचे वर्तन याबद्दल मार्गदर्शन केले आहे. आता ज्ञानी, विवेकी लोक ज्ञानयज्ञ कसा करतात हे भगवंत सांगत आहेत. ज्ञानयज्ञात, आदिसंकल्प हा यज्ञस्तंभ, पंचमहाभूते हा यज्ञमंडप, द्वैतबुध्दी हा पशू, पंचमहाभूतांचे जे विशेष गुण तेच पूजासाहित्य, अज्ञान हे तूप असते. मन आणि बुध्दीच्या कुंडात प्रज्वलित ज्ञानरुपी अग्नी असतो. चित्ताची समता ही वेदी असते. संयम ही यज्ञपात्रे असुन जीव हा यज्ञ करणारा असतो.



यज्ञकर्ता विवेकाच्या महामंत्राने, ज्ञानरुप अग्निहोमाच्या आचरणाने द्वैतभाव नाहीसा करतो. त्यामुळे अज्ञान नष्ट होऊन चोहीकडे समता दिसू लागते. शरीराचे अवयव वेगवेगळे दिसत असले तरीही ते एकाच शरीराचे असतात. वृक्षाच्या फांदया वेगवेगळया दिसल्या तरीही त्या एकाच वृक्षाच्या असतात. त्याप्रमाणे हे जीव वेगवेगळे दिसत असले किंवा वेगवेगळया आकाराने नटले असले तरीही त्यांच्यात ज्ञानीपुरुष भिन्नता न पाहता, ते एकाच ईश्वराचे अंश असल्याचे आपल्या ज्ञानयज्ञात पाहतो. ज्ञानयज्ञात भेद न पाहणा-यांना ज्ञानी म्हणावे हे सांगतांना भगवंत म्हणाले,

**येणें वेगळाले पणें पांडवा । करिती ज्ञानयज्ञु बरवा ।**
**जे न भेदती जाणिवा । जाणते म्हणऊनी ।।**

ज्ञानी लोक जेव्हा-जेव्हा, ज्या ज्या ठिकाणी, जे जे पाहतात तेथे ईश्वरालाच पाहतात. पाण्यावरचा बुडबुडा पाण्यावर आहे तोपर्यन्त वेगळा दिसतो पण प्रत्यक्षात ते पाणीच असते. जमीनीवरील धूलीकण वर उडाले तरी ते पून्हा पृथ्वीवरच येऊन स्थिर होत असतात. त्याप्रमाणे सकृतदर्शनी वेगळे दिसणारे किंवा भिन्न वाटणारे सर्व जीव मूळात एकाच ईश्वरांचे अंश असल्याचे ज्ञानी पाहतो. भूक भागविण्यासाठी निरनिराळया तोंडांना जे अर्पण केले जाते, ते सर्व माझ्या एका तोंडातच येत असते असे ज्ञानी जाणतात. म्हणून भुकेलेल्या जीवमात्रांना ते अन्न देत असतात. ज्यांना भुकेलेली तोंडे माझी असल्याचे दितस नाहीत, म्हणजेच ती वेगवेगळया प्राणीमात्रांची दिसतात. त्यांना शहाणे म्हणण्याचे कारण नाही. जीवमात्रांची सेवा करणा-याला माझ्याप्राप्तीसाठी वेगळे असे कांही करण्याची गरज उरत नाही. जोपर्यन्त माणूस स्वत:ला मी पणात डांबून ठेवतो तो पर्यन्त जीवमात्रावर म्हणजे माझ्यावर ख-या अर्थाने प्रेम करण्याची त्याची मानसिकता निर्माण होऊ शकत नाही. माझ्यापर्यन्त पोहोचण्याचे माध्यम म्हणजे हे सर्व जीवमात्रच आहेत. त्यांच्यात भेद न करता त्यांच्या ठिकाणी भिन्नता न पहाता, त्यांची सेवा करणे, त्यांना आवश्यक ते सहकार्य करणे म्हणजेच माझी सेवा होय. गरजुंना सहकार्य करणे म्हणजे मला सहकार्य केल्यासारखे आहे. शास्त्रांचा प्रचंड अभ्यास करुनही जर जीवमात्रात कोणी भेद पाहत असेल तर त्याचा अभ्यास व्यर्थच गेला असे समजावे, असे भगवंत अर्जुनाला सांगत आहेत. अर्जुनाप्रमाणे संजयही हे ऐकुन तल्लीनतेने मान डोलावत आहे. अर्जुनाला होत असलेल्या उपदेशाचा घरबसल्या फायदा होत असल्यामुळे संजय खूप आनंदी झाला आहे. संजयाप्रमाणे आपणही भाग्यशाली आहोत. कारण घरबसल्या आपण हे ज्ञान संपादकाच्या सहकार्याने मिळवित आहोत. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार,**
**दि. ३ मे २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - वैशाख, कृ. द्वितीया**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- विशाखा (०७.०९)**
**योग - परिघ (२३.१९)**
**करण - तैतिल (१३.५३)**
**राहू काल : रविवार**
**दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष : १९१३:** **दादासाहेब फाळके यांचा 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला भारतीय मूकपट प्रदर्शित.**
**१९३९: नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली.**
**१८९८: चित्रपट महर्षी भालजी पेंढारकर यांचा जन्म.**
**१९५१: राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गहलोत यांचा जन्म.**
**१९५९: भाजपाच्या जेष्ठ नेत्या उमा भारती यांचा जन्म.**



## बुध्द पौर्णिमेनिमित्त पी.बी. ग्रुपच्या वतीने मिठाई वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

प्रबुद्ध भारत चौक, थोरला राजवाडा, मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस कार्यकर्त्यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून तसेच विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पी.बी. ग्रुपचे अध्यक्ष प्रवीण शिंदे व कर्जाळ गावचे युवा नेते संदेश इंगळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन प्रबुद्ध भारत विहारामध्ये बुद्ध पौर्णिमा साजरी करण्यात आली.

यावेळी लहान मुलांना पापा दायमा यांच्या हस्ते लाडू वाटप करण्यात आले. श्रीमंत जाधव, प्रा. अविनाश शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी भारत बाबरे, गौतम इंगळे, पी.बी. ग्रुपचे प्रमुख गौतम चंदनशिवे, पी.बी. ग्रुपचे अध्यक्ष प्रवीण शिंदे, कार्याध्यक्ष विकी कांबळे, गौतम नागटिळक, ॲड. विशाल मस्के, सिद्धार्थ सुर्वे, मनोज थोरात, भैय्या कापुरे, गौरीशंकर शिंदे, अमित माने, प्रदीप शिंदे, संजय इंगळे, बाबा गायकवाड, संतोष चंदनशिवे, गौतम शिंदे, रवी सकट, प्रदीप गवळी, योगेश सरवदे, अरविंद गायकवाड, बाळासाहेब शिंदे, राजाराम लोखंडे, विकी माळाळे, प्रतिक चंदनशिवे, रवींद्र गवळी, भीमा मस्के, रोहन तळभंडारे, लखन चंदनशिवे, मनीष साळवे, सिद्धार्थ तळभंडारे, विशाल वडवेराव, सुनील गायकवाड, सुनील कांबळे, सुजल शिंदे, रत्नशील इंगळे उपस्थित होते.

# सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिका कटिबध्द : महापौर कोंड्याल

## कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्के तर रोजंदारीसाठी प्रतिदिन ५० रुपये वाढीची घोषणा

### शहरातील विविध शाळा, संस्थामध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी महापालिका कटिबद्ध असून नागरिकांना उत्तम सुविधा देण्यासाठी विविध कामांना गती दिली आहे. कर्मचाऱ्यांसाठी ३ टक्के महागाई भत्ता वाढ , रोजंदारीसाठी प्रतिदिन ५० रुपये, अंगणवाडी सेविका-शिक्षिकांना ५०० रुपये वाढ आणि १२० कर्मचाऱ्यांना सुमारे ४ कोटींच्या अर्जित रजेचे वितरण करण्यात येणार असल्याची घोषणा महापौर विनायक कोंड्याल यांनी केली.



महापालिकेच्या वतीने १ मे महाराष्ट्र दिन, सोलापूर महानगरपालिकेचा वर्धापन दिन आज उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त इंद्रभुवन येथे ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी महापालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेविका कल्पना कदम, संगीता जाधव, तसेच नगरसेवक ज्ञानेश्वर माकल, महेश देवकर, नागेश खरात, पृथ्वीराज कोंड्याल, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, वीणा पवार, उपायुक्त आशिष लोकरे,उपायुक्त सोनाली यादव उपस्थित होते.

महापौर विनायक कोंड्याल पुढे म्हणाले, दि. १ ते १५ मे २०२६ या कालावधीमध्ये नागरिकांनी Self Enumeration अर्थात स्वगणना करावयाची आहे. याकरिता भारत सरकार, गृह मंत्रालय यांनी http://se.census.gov.in हे ॲप उपलब्ध करून दिले आहे. शहरातील सर्व नागरिकांनी या कालावधीत स्वगणना करून राष्ट्रीय कार्यास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

### पदोन्नती, वेतनवाढ व अनुकंपा नियुक्त्यावर विशेष भर

पदोन्नती, वेतनवाढ आणि अनुकंपा नियुक्त्यांवर विशेष भर देत कर्मचाऱ्यांच्या कल्याणाला प्राधान्य देण्यात आले. वर्षभरात ४० अनुकंपा नियुक्त्या, ५५ जणांना जमादार पदोन्नती, १०८ जणांना कालबद्ध पदोन्नती मिळाली. तसेच लाड समितीतून ४५२ नियुक्त्या आणि ३४१ वर्ग-४ कर्मचाऱ्यांना १०-२०-३० चा लाभ देण्यात आला.

### महापालिकेच्या वतीने गौतम बुध्द यांची जयंती साजरी

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयात तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेविका वंदना गायकवाड, नगरसेविका श्रीदेवी फुलारे,नगरसेविका सुनीता कामाठी, महेश देवकर,कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, शेखर सकट आदी मान्यवर उपस्थिती होते.



### सोलापूर विद्यापीठ

एकनिष्ठता, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यदक्षता या मूल्यांच्या आधारे केलेले कार्य संस्थेच्या प्रगतीस गती देत असते आणि संस्थेच्या प्रगतीतूनच राष्ट्राचा सर्वांगीण विकास साध्य होतो. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तव्यांप्रती निष्ठा ठेवून कार्य करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी केले. महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त विद्यापीठ परिसरात आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. महानवर यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य देवानंद चिलवंत, परीक्षा संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी महादेव खराडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे उपस्थित होते.



## एमआयटी विश्वशांती गुरुकुल शाळा

एमआयटी माईर्सच्या विश्वशांती गुरुकुल शाळेमध्ये १ मे रोजी 'महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे स्मरण व समृद्ध सांस्कृतिक वारशाचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम विशेष संमेलनाच्या स्वरूपात आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या आत्मीय स्वागताने झाली. त्यानंतर ध्वजारोहण समारंभ पार पडला. राष्ट्रगीतासाठी सर्व उपस्थित आदराने उभे राहिल्याने वातावरण अभिमानाने भारावून गेले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या राज्यगीताने उपस्थितांमध्ये देशभक्तीची भावना अधिकच दृढ केली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा परिषद येथील साहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक (उच्च माध्यमिक) अनिल बनसोडे लाभले आपल्या भाषणादरम्यान, अनिल बनसोडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी वारशाचे अत्यंत सुंदर रीतीने दर्शन घडवले. रेखा पाटील यांनी लता मंगेशकर, तसेच अनेक नामवंत साहित्यिक आणि समाजसुधारक यांच्या योगदानाचा अत्यंत विचारपूर्वक उल्लेख केला.

यावेळी एमआयटी विश्वशांती गुरुकुल ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य राजकुमार गायकवाड उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मराठी व इंग्रजी भाषेत प्रभावी भाषणे सादर करून कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी शाळा परिसर महाराष्ट्राच्या संस्कृती, सण-उत्सव, खाद्यसंस्कृती आणि ऐतिहासिक स्थळांचे दर्शन घडवणाऱ्या आकर्षक पोस्टर्स व चित्रांनी सजवण्यात आला होता. त्यामुळे हा सोहळा माहितीपूर्ण व दृश्यात्मकदृष्ट्याही लक्षवेधी ठरला.

### डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूल

डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूल व डॉ. आंबेडकर मेमोरियल नाईट हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमानाने कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमा, महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष भागवत सरवदे, संस्थेचे सचिव प्रवीण निकाळजे, विश्वस्त शशिकांत कांबळे, मुख्याध्यापिका संतोषी साबळे, नाईट प्रशालेचे मुख्याध्यापक सतीश शिंदे हे व्यासपीठावर उपस्थित होते. द कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री भगवद्जी सरवदे यांच्या हस्ते १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.बुद्ध पौर्णिमेनिमित्त सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आहे. प्रास्ताविक नाईट प्रशालेचे मुख्याध्यापक सतीश शिंदे यांनी होते. शिक्षक प्रतिनिधी म्हणून चित्रा धाराशिवकर यांनी आपले मनोगत व्यक्त होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष भगवत सरवदे यांनी अध्यक्षीय भाषण होते. या कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून करण्यात आहे. सूत्रसंचालन दीपक माने आणि विश्वनाथ कुलकर्णी यांनी होते. तर आभार सुशील जानराव यांनी मानले.





### कुचन प्रशाला

कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण येथे महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. प्रथम मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले राष्ट्रध्वजाला सलामी देत वंदे मातरम, राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचे गायन घेण्यात आले. प्राचार्य युवराज मेटे यांनी सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देत सर्वांनी महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी एकजुटीने काम केले पाहिजे व आपल्या राज्याचा अभिमान बाळगला पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल मल्लिकार्जुन जोकारे यांची उपस्थिती होती.

### नेताजी शिक्षण संकुल

निलम नगर येथील नेताजी प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ६७ वा महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर इयत्ता चौथीत प्रथम क्रमांक पटकाविलेल्या श्राव्या नडगेरी या विद्यार्थिनींच्या हस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहण करण्यात आले.




यावेळी प्राचार्य रविशंकर कुंभार, सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, पालक-शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष संतोष पुजारी, नागेश कोल्हापुरे, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार , रुपाली नडगेरी, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्राथमिक शाळेतील आदित्य बिराजदार, श्रावणी नागठाण, श्राव्या नडगेरी माध्यमिक प्रशालेतील जान्हवी कांबळे, पृथ्वीराज जमादार, व्यंकटेश मिस्कीन, इरेश अक्का,ओंकार एडके व महाविद्यालयातील पल्लवी भोरगुंडे, रेवती कुलकर्णी, जयश्री भोरगुंडे, सुधाश्री चिटकुल, लक्ष्मी निंबर्गी, भार्गवी शिरपूर, स्वाती ठोंबरे, योगिता पगड्याल, श्रावणी पवार या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कामगार दिनानिमित्त नागेश कोल्हापुरे यांना आदर्श कामगार पालक पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रमुख अतिथी विजयकुमार हुल्ले म्हणाले, विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच कष्टाची जोड देऊन जीवनात यश संपादन करावे. यावेळी इयत्ता पाचवी ते नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्यात आले. सूत्रसंचालन शिवानंद पुजारी यांनी केले तर विश्वाराध्य मठपती यांनी आभार मानले.

## बारावीचा निकाल लागला; पण खरी परीक्षा आता सुरू!

### गुणांसोबत योग्य दिशा देणं गरजेचं

बारावीचा निकाल लागला की सगळीकडे एकच गडबड कोणाला किती टक्के, कुठे ॲडमिशन घ्यायचं, पुढे काय करायचंयंदाही तसंच चित्र आहे. पुणे विभागाचा निकाल ९०.९८% लागला, मुलींनी पुन्हा आघाडी घेतली, आणि सोलापूर ८४.८९% वर थांबला. निकाल वाईट नाही, पण अजून सुधारणा करण्याची संधी नक्कीच आहे. मात्र, इथे थांबून चालणार नाही. खरी गरज आहे ती पुढचं नियोजन करण्याची. सर्वात आधी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी टक्केवारी म्हणजे सगळं काही नाही. ९०% आले तरच आयुष्य बनतं आणि कमी आले तर संपतं, असं अजिबात नाही. आजच्या काळात करिअरचे अनेक पर्याय आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड, क्षमता आणि भविष्याचा विचार करून निर्णय घ्यायला हवा. पालकांनीही मुलांवर फक्त सायन्सला जा असा दबाव टाकण्यापेक्षा त्यांना योग्य मार्गदर्शन करायला हवं.




दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे करिअर गाइडन्सचा अभाव. शहरात काही प्रमाणात सुविधा असतात, पण ग्रामीण भागात अजूनही योग्य माहिती मिळत नाही. अनेक विद्यार्थी केवळ मित्रांच्या मागे जाऊन शाखा निवडतात. हे टाळण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि स्थानिक प्रशासनाने करिअर मार्गदर्शन शिबिरे आयोजित करायला हवीत. तज्ज्ञांना बोलावून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रांची माहिती देणं गरजेचं आहे.

तिसरी गोष्ट निकालाचं विश्लेषण करून सुधारणा करणे. सोलापूरचा निकाल विभागाच्या तुलनेत कमी आहे, म्हणजे काहीतरी कमी पडतंय. शिक्षकांना अधिक प्रशिक्षण देणं, विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त तास घेणं, नियमित चाचण्या घेणं अशा उपाययोजना केल्यास निकालात नक्कीच सुधारणा होऊ शकते. शाळांनी फक्त निकाल जाहीर करून थांबू नये, तर पुढच्या वर्षासाठी ठोस योजना आखायला हवी. शाखानिहाय पाहिलं, तर सोलापूरमध्ये सायन्सचा निकाल ९५.५२% आहे. ही खूप चांगली बाब आहे. पण आर्ट्सचा निकाल ७२.८५% वर आहे. म्हणजे इथे जास्त लक्ष देण्याची गरज आहे. आर्ट्स आणि कॉमर्सकडे दुर्लक्ष न करता त्या शाखांनाही चांगल्या सुविधा, शिक्षक आणि मार्गदर्शन मिळालं पाहिजे.

यासोबतच विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणंही तितकंच महत्त्वाचं आहे. निकालाच्या काळात अनेक मुलांवर ताण येतो. काही वेळा अपेक्षित निकाल न आल्यामुळे ते खचतात. अशावेळी पालकांनी त्यांना समजून घ्यायला हवं. तुझं आयुष्य फक्त या निकालावर अवलंबून नाही हा विश्वास देणं खूप गरजेचं आहे. शाळांनीही समुपदेशन (काउन्सेलिंग) सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात. आजच्या डिजिटल युगात ऑनलाइन शिक्षणाचा वापर वाढवणं हीही गरज आहे. यूट्यूब लेक्चर्स, ऑनलाइन टेस्ट, ॲप्स याचा फायदा विद्यार्थ्यांना होऊ शकतो.

ग्रामीण भागात इंटरनेट आणि डिजिटल साधनं उपलब्ध करून दिली, तर तिथले विद्यार्थीही पुढे येऊ शकतात. एकंदरीत काय, तर बारावीचा निकाल हा शेवट नाही.तो फक्त पुढच्या वाटेची सुरुवात आहे. सोलापूरसारख्या जिल्ह्यांनी आता निकालावर समाधान मानून न थांबता, पुढच्या वर्षासाठी अधिक चांगलं नियोजन करायला हवं. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि प्रशासन सगळ्यांनी मिळून काम केलं, तर निकालात नक्कीच सुधारणा होईल. शेवटी एवढंच गुण महत्त्वाचे आहेत, पण योग्य दिशा त्याहून महत्त्वाची आहे. पुढचं पाऊल विचारपूर्वक टाका, यश तुमचंच असेल!

**जिल्हा परिषदेतून**



**यशवंत गुरव**
**मो. ८८८८६५०७५५**

## महाराष्ट्र दिन साजरा



### जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या राज्य स्थापना दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते शुक्रवार, दिनांक १ मे रोजी सकाळी ७.१० वाजता ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी महसूल लक्ष्मण कसेकर, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अन्न धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे उपस्थित होते. प्रारंभी राष्ट्रगीत वंदे मातरम्‌चे गायन झाले. त्यानंतर राष्ट्र ध्वजवंदन व सलामी होऊन राष्ट्रगीत व राज्यगीतचे गायन झाले.



### सुयश विद्यालय, बार्शी

सुयश विद्यालय, बार्शी येथे महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक शिवदास नलवडे, संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, मुख्याध्यापिका अलका जगताप तसेच उपमुख्याध्यापक येवले उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. यानंतर संस्थापक शिवदास नलवडे यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना महाराष्ट्र दिनाचे महत्त्व समजावून सांगत प्रेरणादायी मार्गदर्शन केले.



### विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास, पंढरपूर

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांच्या हस्ते ध्वजारोहण समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी मंदिर समितीचे सदस्य हभप ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), तसेच विभाग प्रमुख संजय कोकीळ, राजेंद्र सुभेदार, पांडुरंग बुरांडे, राजेश पिटले, राजाराम ढगे, राजेश तेलतुंबडे, राजेंद्र घागरे, सावता हजारे, दादा नलवडे उपस्थित होते. महाराष्ट्र दिनानिमित्त श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेस पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले. श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, हिऱ्याचे कंगन जोड, दंडपेट्या, मोत्याची कंठी, शिरपेच, मोत्याचा तुरा, मत्स्य जोड, तुळशीची माळ, तोडे, तांदळ्या हार, पदकासह लॉकेट, मोहरांची माळ आदी अलंकार परिधान करण्यात आले. तसेच श्री रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या जोड, तोडे, तानवड जोड, तांबडी चिंचपेटी, जवमनी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी व कंबरपट्टा आदी अलंकार परिधान करण्यात आले.

### तहसील कार्यालय, पंढरपूर

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या राज्य स्थापना दिनानिमित्त तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते शुक्रवार, दिनांक १ मे रोजी सकाळी शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, वैभव बुचके, दीपक शिंदे, मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम उपस्थित होते. यावेळी वंदे मातरम् गीत राष्ट्रगीत व राज्यगीत गायन झाले. तसेच आणीबाणीच्या काळात बंदीवास सोसावा लागलेल्या पंढरपूर तालुक्यातील व्यक्तींचा आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार पंढरपूर तालुक्यात दि.१ मे २०२६ पासून डिजीटल जनगणना मोहिमेला प्रारंभ झाला आहे. पहिल्या टप्प्यात तालुक्यातील प्रत्येक घराची तसेच कुटुंबातील मूलभूत सुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या राज्य स्थापना दिनानिमित्त दि.१ मे २०२६ रोजी आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणिती भालके, नगरसेवक व मान्यवर पदाधिकारी यांनी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन स्वयं-गणना करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवला असल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी जनगणनेबाबतची माहिती उपस्थितांना देवून, नागरिकांनी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन स्वयं-गणना करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

# वटवृक्ष मंदिर परिसरात वाहतूक कोंडी

## वाहतुक पोलिसांचे अस्तित्वच दिसत नाही

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ मे-**

महाराष्ट्र दिन, शनिवार व रविवार अशी तीन दिवस सलग सुट्टी असल्याने अक्कलकोट स्वामी भक्तांनी गजबजले आहे. वटवृक्ष स्वामी मंदिर परिसरात दोन्ही बाजुने अवैध प्रवाशी वाहतुक वाहने, अँटो रिक्षा बेशिस्तपणे पार्क होत असून वाहनाची कोंडी होत आहे. ट्रॅव्हल्सच्या मोठ्या गाड्या शहरा बाहेर न थांबता अन्नछत्र मंडळासमोर येत जात आहेत. सर्व प्रकारामुळे वाहतुकीची कोंडी होत आहे .

वटवृक्ष मंदिर परिसरात रिक्षा भर रस्त्यावर उभ्या असतात, अवैध प्रवासी वाहने घिरट्या घालतात. या वाहन चालकाची मोठी दादागिरी आहे. रिक्षा चालक नवसाचा मारुती मंदिरास वेढा घालून वाहने उभी करतात. परिणामी भाविकांना मारुती मंदिराचे दर्शन घेता येत नाही. लॉजमध्ये उतरलेल्या भाविकांची वाहने पार्किंगची जागा सोडून रस्त्यावर पार्क केली जातात. वाहतुक पोलीसांचे याकडे दुर्लक्ष आहे. यामुळे पादचारी नागरिक भाविक त्रस्त आहेत.

नगरपालिकेने भोसले व्यापारी संकुलात वाहन पार्किंगसाठी राखीव ठेवली आहे; मात्र या संकुलात लॉजिंग व हॉटेलमध्ये नाष्टा-पाण्यासाठी येणाऱ्या भाविकांची तसेच लॉजमधील भाविकांची वाहने रस्त्यावर उभी केली जातात. फत्तेसिंह चौक परिसरात, भालके बोळ, गंगणे बोळ, गोंन्डाळ बोळ व कदम बोळ परिसरातील रहिवाशांना त्यांच्या घरी जाण्या येण्या करिता अडथळ्याचे ठरत आहे. वाहने बोळा समोर उभी होत असल्याने वाहनांची कोंडी होत आहे. याकडे ट्रॉफिक पोलीसांचे दुर्लक्ष होत आहे.



**वाहतुक कोंडी होण्याची प्रमुख कारणे**

- वटवृक्ष मंदिर परिसरात रिक्षा, अवैध प्रवासी वाहनांचे बेशिस्त पार्किंग
- प्रवाशांच्या ट्रॅव्हल्स बस अन्नछत्र परिसरात येणे
- नवसाचा मारुती मंदिरासमोर रिक्षांची बेशिस्त पार्किंग
- भोसले व्यापारी संकुलातही वाहनांची बेशिस्त पार्किंग



# अकलूज येथे श्री नृसिंह जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ मे-**

येथील श्री नृसिंह गणेशोत्सव मंडळ यांच्या वतीने श्री नृसिंह जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कासार गल्ली येथील कै. मोतीलाल रामचंद्र वेळापूरे व परिवाराने स्वातंत्र्यपूर्व काळात श्री नृसिंह मंदिराची स्थापना केली. दरवर्षी येथे श्री नृसिंह जयंती साजरी करण्यात येते. मागील सुमारे दहा वर्षापासून वेळापुरे परिवार हा जयंती सोहळा मोठ्या प्रमाणावर साजरे करत आहे.

नृसिंह जयंती निमित्त मंदिरात श्री नृसिंहाचा अभिषेक व पूजा करण्यात आली. तर भजनी मंडळाने धार्मिक वातावरण निर्माण केले. सायंकाळी सहा वाजता श्री नृसिंह जन्म सोहळा व महाआरती संपन्न झाली. यानंतर हजारो भाविकांना वेळापूरे परिवाराच्या वतीने महाप्रसादाचा लाभ देण्यात आला.

शिवापूर पेठेतील मुख्य बाजारपेठेत असणारे हे मंदिर भाविकांचे व व्यापारी वर्गाचे श्रद्धास्थान आहे. मोहन वेळापुरे, विजय वेळापुरे, राजकुमार वेळापूरे, प्रमोद वेळापूरे, विनोद वेळापुरे, मयूर वेळापूरे, शैलेश वेळापुरे, अमर वेळापुरे, दत्तात्रय वेळापुरे, वैभव वेळापुरे, योगेश वेळापूरे, मनोज वेळापूरे, प्रकाश वेळापुरे व समस्त वेळापूरे परिवारांनी जयंती सोहळा धार्मिक पद्धतीने साजरा केला.



# मोठे बदल घडवण्यासाठी मोठी पदे आवश्यक

**पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी; कॉलेज ऑफ फार्मसी येथे पारितोषिक वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाच्या कॉलेज ऑफ फार्मसी येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. अरफा पटेल यांनी प्रस्तावना व स्वागत केले. प्राचार्य डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. विद्यार्थी प्रतिनिधी समर्थ शेरखाने यांनी वार्षिक अहवाल सादर केला.शैक्षणिक, क्रीडा, कला व सांस्कृतिक क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

संस्थेचे चेअरमन राजशेखर शिवदारे यांच्या हस्ते माजी विद्यार्थी रमेश होनराव यांचा महाराष्ट्र राज्य सेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रा. भीमाशंकर शेटे यांनी अवांतर वाचनाचे महत्त्व सांगितले. आभार बाबुराव चांदकवठे यांनी मानले.

# सांगोला महाविद्यालयात नियतकालिक माणदेशचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २ मे-**

सांगोला महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक माणदेशचे प्रकाशन दि.१ मे रोजी संस्था उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सहसचिव साहेबराव ढेकळे, सदस्य म.सि. झिरपे, सुरेश फुले, सु.ग.उकळे, प्र.प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, नियतकालिकाचे संपादक डॉ.जमीर तांबोळी उपस्थित होते. माणदेश नियतकालीकेसाठी सहसंपादक डॉ.विधीन कांबळे, प्रा.डॉ.नवनाथ शिंदे, डॉ.भारत पवार, प्रा.संतोष लोंढे, नरेंद्र पाटील, डॉ.अमोल पवार, डॉ. ओंकार घाडगे, प्रा.विशाल कुलकर्णी, प्रा.डॉ. भाग्यश्री पाटील, प्रा.प्राप्ती लामगुंडे व कार्यालयीन प्र.अधीक्षक विलास माने यांनी परिश्रम घेतले.



# बुध्द पौर्णिमेनिमित्त तथागत बुध्दांना वेळापुरात वंदन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २ मे-**

बुद्ध पौर्णिमेच्या पावन निमित्ताने वेळापूर येथील तथागत बुद्ध विहार येथे भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी ज्येष्ठ शिवाजी बनसोडे, विजय बनसोडे, दिलीप बनसोडे, दादा कांबळे, सुभाष बनसोडे, धनाजी धांडोरे, स्वप्निल सरवदे, दिलीप भोसले, दयानंद बनसोडे, रमेश बनसोडे, रामभाऊ गायकवाड, वैभव बनसोडे, सागर बनसोडे, बाळासाहेब बनसोडे, गणेश धांडोरे, बापू केंगार, यथार्थ बनसोडे, हर्षद कांबळे, अंकुर गायकवाड उपस्थित होते.

कार्यक्रमा दरम्यान बाळासाहेब धांडोरे यांनी उपस्थित सर्वांना सामूहिक पंचशील व त्रिशरण ग्रहण करून दिले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ, पंचशील नगरचे अध्यक्ष सतीश कांबळे व उपाध्यक्ष जीवा लोंढे यांनी केले होते.

# बोरामणीत बांधल्या गेल्या रेशीमगाठी

## पंचायत समिती सदस्य धनेश आचलारे मित्र मंडळाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २ मे-**

बोरामणी येथे शुक्रवार, दि.१ मे रोजी सायंकाळी ६ वाजून २१ मिनिटांच्या मुहूर्तावर एसव्हीसीएस प्रशालेच्या प्रागणांत पाच जोडप्यांच्या सप्तपदीच्या 'रेशीमगाठया' बांधण्यात आल्या.

माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त पंचायत समितीचे माजी सदस्य धनेश आचलारे यांच्यावतीने गेल्या १४ वर्षांपासून मोफत सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळयांचे आयोजन करण्यात येत असून आतापर्यंत २७८ जणांचे रेशीमगाठी बांधण्यात आले आहेत.

यावेळी संयोजन समितीतर्फे वधूस मणी-मंगळसूत्रसह सौभाग्य अंलकार, शालू तसेच नवरदेवास सफारी पोषाखसह हळदीचे कपडे देण्यात आले. यावेळी वधू-वरांचे गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आले.त्यानंतर अक्षता सोहळा संपन्न झाला.

यावेळी खासदार डॉ. ज्योती वाघमारे, माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, शिवसेना जिल्हा प्रमुख अमर पाटील व अमोल शिंदे, जिल्हा परिषद शिवराज म्हेत्रे, दुधनीचे नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे, दिलीप सिध्दे,बाळासाहेब वाघमारे, सुनील बनसोडे, आनंद तानवडे, सुदर्शन साठे उपस्थित होते. यावेळी संयोजक आचलारे म्हणाले, विवाह सोहळयात सहभागी झालेल्या वधू-वरांस पहिली मुलगी झाल्यास त्या मुलींचे नांवे धनेश आचलारे यांच्यावतीने 'मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे कन्यारत्न' योजनेतंर्गत त्या मुलींच्या नांवे अकरा हजाराची ठेव बँकेत ठेवली जाणार आहे. १८ वर्षानंतर वाढीव रक्कम त्या मुलीला मिळणार आहे.



**समाज आणि मठ पाठिशी राहील!..**

नुकतेच, जिल्हा परिषद निवडणुकीत धनेश आचलारे यांचा पराभव झाला तरी त्यांनी आपल्या सामाजिक कार्यात खंड पडू दिला नाही. समाजकार्य करून ते सामाजिक ऋण फेडण्याचे काम करीत आहेत असेच उपक्रम राबवित राहा एक दिवस निश्चितच यश मिळेल आणि तुमच्या पाठीशी समाज आणि होटगी बृहन्मठ कायम पाठीशी राहील, असा आशीर्वाद काशीपीठाचे जगद्गुरू डॉ मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी दिले.



# वटवृक्ष मंदिरात घोडके, भरमशेट्टी, रोट्टे यांचा पोलिस खात्यातील नोकरी प्रित्यर्थ सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २ मे-**

खंडप्पा घोडके यांची मुंबई पोलिस खात्यात, अन्दप्पा भरमशेट्टी यांची मीरा भाईंदर पोलिस खात्यात तर चंद्रकांत रोट्टे यांची पुणे शहर पोलिस खात्यात विविध पदांवर नोकरी लाभल्या प्रित्यर्थ येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी खंडप्पा घोडके, अन्दप्पा भरमशेट्टी, चंद्रकांत रोट्टे यांचा श्री.स्वामी समर्थांचे कृपावस्त्र देवून सन्मान केला.

यावेळी बोलताना चेअरमन महेश इंगळे यांनी मनातील जिद्द व चिकाटीला आपले लक्ष बनवून परस्थितीशी संघर्ष करत खंडप्पा घोडके, अन्दप्पा भरमशेट्टी, चंद्रकांत रोट्टे यांनी मिळवलेल्या यशाबद्दल महेश मालक इंगळे यांनी कौतुक केले. यावेळी प्रथमेश मालक इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, वैभव जाधव, शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, सचिन बंदिछोडे, ज्ञानेश्वर मरे, सूर्यकांत रोटटे, नागेश घोडके, रमेश शिंदे, अमर पाटील, श्रीकांत मलवे, खाजप्पा झंपले, सुनिल पवार उपस्थित होते.

# पंढरपुरात डिजिटल जनगणनेला प्रारंभ

## प्रगणकांना माहिती देऊन सहकार्य करण्याचे मुख्याधिकारी रोकडे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ मे-**

केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार पंढरपूर शहरात १ मे पासून डिजिटल जनगणना मोहिमेस प्रारंभ झाला आहे. प्रगणकांना आपली वैयक्तिक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

सन २०२७ रोजी होणारी सदरील जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे . प्रथमच अशा स्वरूपात ही प्रक्रिया राबविली जात आहे. जनगणनेचा पहिला टप्पा १ मे ते १५ मे या कालावधीत होणार आहे. त्या दरम्यान नागरिकांना स्वयं नोंदणीची (स्वगणना) सुविधा देण्यात आली आहे. नागरिकांनी संकेतस्थळावर जाऊन ३४ प्रश्नांची माहिती भरावयाची आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर मिळणारा युनिक कोड (SE ID) पुढील टप्प्यात प्रगणकाला देणे आवश्यक आहे. आमदार समाधान अवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक , नगराध्यक्ष प्रणिता भालके तसेच सर्व समितीचे सभापती व नगरसेवक तसेच प्रतिष्ठित नागरिक यांची प्रशासनाने स्वगणना केलेली आहे. दुसऱ्या टप्प्यात दि. १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील. स्वयं नोंदणी केलेल्या नागरिकांना केवळ युनिक कोड देऊन प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

वैयक्तिक माहिती केवळ सांख्यिकी हेतूसाठी या जनगणनेत नागरिकांची वैयक्तिक माहिती, कुटुंब रचना, घराचा प्रकार, सदस्यांची संख्या तसेच घरातील उपलब्ध सुविधा याचा तपशील गोळा करण्यात येणार आहे. सदरची माहिती केवळ सांख्यिकी हेतूसाठी वापरली जाणार असून गोपनीयतेची पूर्ण हमी देण्यात आली आहे.



पंढरपूर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, जनगणनेच्या काम काजा करिता नियुक्त प्रगणक घरी आल्यानंतर त्यांना वैयक्तिक माहिती देऊन सहकार्य करावे - **महेश रोकडे** (मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद)

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महाराष्ट्र दिनानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात फुलांची सजावट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ मे-**

महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त शुक्रवारी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व गाभाऱ्यात विविध फुलांची आकर्षक सजावट केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली. सजावटीमुळे श्रींचा गाभारा मनमोहक व आकर्षक दिसत होता. यासाठी शेवंती, जरबेरा, झेंडू, गुलाब, रॉकेट, ब्लू डीजी इत्यादी दोन टन फुलाचा वापर केला होता.

ही सजावट विठ्ठल भक्त युवराज सोनार, विजय सोनार, दादासाहेब पोकळे व सचिन चव्हाण, पुणे यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली आहे.





## थोडक्यात..



### सांगोला नगरपरिषदेत महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण

**सांगोला, दि. २ मे-**

महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त सांगोला नगरपरिषदेच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह प्रांगणात नगराध्यक्ष आनंदा माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीताच्या सुरांमध्ये तिरंग्याला सलामी देण्यात आली. याप्रसंगी उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी उपस्थित होते. यावेळी आनंदा माने यांनी सांगोला शहरवासीयांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. डॉ.सुधीर गवळी यांनी दि.१ ते १५ मे पर्यंत वेळेची बचत व अचूक माहिती नोंदविण्याच्या दृष्टीने आपल्या घरून स्वगणना करण्याविषयी आवाहन केले. यावेळी माजी सैनिक, वीर माता व पत्नी यासोबतच नगरपरिषदेच्या सफाई कर्मचारी बांधवांचा सन्मान करण्यात आला.

### बार्शी शहर व परिसरात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**बार्शी, दि. २ मे-**

बार्शी शहर व परिसरात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य ध्वजारोहण तहसील कार्यालय येथे आमदार दिलीप सोपल यांच्या हस्ते झाले. यावेळी तहसीलदार एफ.आर.शेख, निवासी नायब तहसीलदार सुभाष बदे, मुख्याधिकारी तैमूर मुलाणी, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, कृषी अधिकारी संतोष कोयले यांच्यासह सर्व शासकीय अधिकारी उपस्थित होते. आमदार दिलीप सोपल यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. स्वातंत्र्य सैनिकांच्या वीरमाता, वीरपत्नींचा सन्मान करण्यात आला. नगरपरिषदेच्या प्रांगणात नगराध्यक्ष तेजस्विनी कथले यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. मुख्याधिकाऱ्यांसह कर अधिकारी विठ्ठल पाटोळे, नगर अभियंता राहुल अडसूळ, जलदाय अभियंता अजय होनखांबे, आरोग्य विभाग प्रमुख शब्बीर वस्ताद यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सुलाखे हायस्कूलमध्ये सुरेश हलमे यांच्या हस्ते ध्वजा रोहन झाले. प्राचार्य रामचंद्र इंगळे, उपमुख्याध्यापक प्रसन्न देशपांडे, पर्यवेक्षिका उज्ज्वला जावळे, पर्यवेक्षक अजय कदम उपस्थित होते.

### घरावरील पत्रे काढताना मजूर जखमी

**सोलापूर, दि. २ मे-**

घरावरील पत्रे काढण्याचे काम करीत असताना खाली पडून एक मजूर जखमी झाल्याची घटना दक्षिण सदर बाजार भागातील शिक्षक सोसायटी येथे गुरुवारी सायंकाळी घडली. शशिकांत पोपळे ( वय ५८, रा. गवळी वस्ती , एमआयडीसी सोलापूर ) असे त्याचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी घरावरील पत्रे काढण्याचे काम करीत असताना तोल जाऊन खाली पडले. यात कमरेस व पायास मार लागल्याने त्यांना उपचारासाठीह शासकीय रुग्णालयात पत्नी सुमन यांनी रात्री दाखल केले.



### ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांची वेताळ साहेब देवस्थानला भेट

**मोडनिंब, दि. २ मे-**

मोडनिंब (ता. माढा) येथील ग्रामदैवत श्री वेताळ साहेब देवस्थानला ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांनी भेट दिली व दर्शन घेतले. याप्रसंगी ग्रामस्थ व श्री वेताळ देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचा सन्मान झाला. श्री. वेताळ बाबांचे दर्शन घेऊन डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या पणजी येथे होत असलेल्या तिसऱ्या महाअधिवेशनासाठी रवाना होणार असल्याचे माने यांनी सांगितले. याप्रसंगी वेताळ देवस्थान ट्रस्टचे संभाजी लादे, सचिव विजय खेलबुडे, मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, राष्ट्रवादी प्रदेश काँग्रेसचे ॲड. विजयसिंह गिड्डे, पत्रकार प्रथमेश पवार, यशवंत पवार, जयंत पवार, पुजारी गुरव,अमेय पवार, श्रेयस फाळके, सिद्धांत गांधी, शुभम काळे आदी उपस्थित होते.

# सर्व नागरिकांनी स्व जनगणनेत सहभाग घेऊन कर्तव्य पार पाडावे : पालकमंत्री

## पालकमंत्र्यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

जनगणना २०२७ ही भारताची १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना असून ही पहिली पूर्णपणे डिजिटल जनगणना आहे. सदर जनगणना ही केवळ लोकसंख्या व अनुषंगीक माहिती बाबत नसून ती एक भविष्यातील विकासाचे म ापदंड ठरविण्याची प्रक्रिया आहे. आजपासून ते १५ मे २०२६ पर्यंत स्वगणनेस सुरुवात होत आहे. तरी जिल्हयातील सर्व नागरिकांनी स्व जनगणनेत सहभाग घेऊन राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त पोलीस परेड ग्राउंड येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, महापालिका आयुक्त सचिन ओंबसे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, स्वातंत्र्य सैनिक, आणीबाणी विरोधी योद्धे, ज्येष्ठ नागरिक, पदाधिकारी, अधिकारी व अन्य मान्यवर विद्यार्थी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, सोलापूर जिल्ह्यातील कृषी क्षेत्राने सन २०२५-२६ मध्ये उल्लेखनिय प्रगती साधली आहे. जिल्ह्यातील शेतक-यांना शासनाच्या विविध योजनांचा मोठा लाभ मिळाला आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत ४ लाख ८६ हजार लाभार्थ्यांना ९७ कोटी ३९ लाख रुपये थेट खात्यात जमा झाले आहेत. तसेच यावर्षीच्या खरीप हंगामासाठी खते व बियाणे मुबलक व समप्रमाणात पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ७८३ कोटी निधी मंजूर होता. या सर्व निधीतून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची कामे घेण्यात आलेली असून १००% टक्के निधी खर्च झाला आहे. तर जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ अंतर्गत सोलापूर जिल्ह्याला ८४२ कोटी निधी मंजूर आहे. सदर निधीतून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कामे हाती घेता येतील.

सोलापूर वासियांचे विमान सेवा सुरु करण्याचे अनेक दिवसाचे स्वप्न साकार झाले असून सध्या मुंबई, गोवा याठिकाणी विमानसेवा सुरु झाली असून नजीकच्या काळात तिरुपती हैद्राबाद व पुणे या सेवा सुरु होतील. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रगीत वंदे मातरम चे गायन झाले. त्यानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले व राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीत व राज्यगीत गायन झाले. परेड कमांडर विशाल नवले यांच्या समवेत पालकमंत्री गोरे यांनी परेडचे निरीक्षण केले. व त्यानंतर परेडचे पथ संचलन संपन्न झाले.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते पोलीस महासंचालक पदक विजेत्या पोलीस विभागाचे अधिकारी कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रमाणेच क्रीडा, महिला बाल विकास व अन्य विभागातील पुरस्कार प्राप्त अधिकारी कर्मचारी यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर उपस्थित होते.

## हरंगुळ-पुणे व दौंड-कलबुर्गी रेल्वे गाड्यांचा विशेष दर्जा रद्द

### खा. धैर्यशील मोहिते-पाटील; आता कायमस्वरूपी धावणार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ मे -**

हरंगुळ-पुणे तसेच दौंड-कलबुर्गी या रेल्वे गाड्यांचा विशेष दर्जा रद्द केला आहे. दोन्ही गाड्या आता कायम स्वरूपी धावणार असल्याची माहिती खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिली. यामुळे या गाड्यांचे तिकीटदरही सुमारे निम्म्यावर येणार आहेत.

जेऊर, कुर्डूवाडी, माढा या स्थानकांवरून सोलापूरला सकाळच्या वेळेत जाण्यासाठी पुरेशा गाड्या नव्हत्या. सकाळी साडेपाचची एक गाडी आणि त्यानंतर थेट दुपारी बारा वाजताची गाडी उपलब्ध होती. सकाळी ७ ते ८ दरम्यान सोलापूरसाठी गाडी सुरू करण्याची मागणी प्रवाशांकडून होत होती. यासाठी दौंड-कलबुर्गी गाडी सुरू केली होती; मात्र काही काळानंतर ती बंद झाली होती. लोकसभा निवडणुकीनंतर खासदार मोहिते-पाटील यांनी सोलापूर येथील डीआरएम कार्यालयात बैठक घेऊन ही गाडी पुन्हा सुरू करण्याची मागणी केली. प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर आता ही गाडी कायमस्वरूपी केली आहे. गाडी क्रमांकापुढील '0' काढले आहे. त्यामुळे तिकीटदरातही घट होणार आहे.

लातूर व धाराशिव जिल्ह्यातून पुण्याकडे दुपारच्या वेळेत थेट रेल्वे सेवा नव्हती. प्रवाशांच्या मागणीनुसार हरंगुळ-पुणे गाडी दुपारी ३ वाजता लातूरहून सुटून रात्री पुण्यात पोहोचत होती. या गाडीला मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती. तिकीट सतत वेटिंगमध्ये असायचे. खा. मोहिते-पाटील यांनी लोकसभेत ही गाडी कायम स्वरूपी करण्याची तसेच हडपसरऐवजी पुणे स्टेशनपर्यंत वाढवण्याची मागणी केली होती. रेल्वे प्रशासनाने ही मागणी मान्य केली आहे.

### आहेरवाडी येथे पैशाच्या व्यवहारातून एकास बेदम मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

पैशाच्या व्यवहारातून एका इसमाला दगड, लाकूड व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथे गुरुवारी सायंकाळी घडली. गणपती धोत्रे ( वय ४०, रा. आहेरवाडी) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी सहा वाजता आहेरवाडी येथील शेतात पैशाच्या व्यवहारातून त्यांना गुरप्पा पाटील याने मारहाण केली. यात डोक्याला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्यांना उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात पत्नी इंदुबाई यांनी दाखल केले.

## बारावी परीक्षेत आदर्श ज्युनियर सायन्स कॉलेज कुर्डुवाडीत अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २ मे -**





आदर्श ज्युनियर सायन्स कॉलेज, कुर्डूवाडी यांनी उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत सलग पाचव्या वर्षी परिसरात अव्वल स्थान कायम राखले आहे. म हाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागल्याने आनंदाचे वातावरण आहे.

रौनक सय्यद हिने ८४.०० टक्के गुण मिळवत कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. अनुपमा लोंढे हिने ८३.८३ बारावी परीक्षेत टक्के गुणांसह द्वितीय, तर शिवानी व्यवहारे व तेजश्री नलवडे यांनी ८३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे. ८५ विद्यार्थ्यांपैकी ६७ विद्यार्थी विशेष प्राविण्य, १८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

यशस्वी कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, प्राचार्या शकिलाबी सय्यद व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शक्तीपीठ महामार्ग अदानीसारख्या 'महादेवां'साठीच

### राजू शेट्टींचा वेळापुरात घणाघात

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २ मे-**

गरज नसलेला शक्तीपीठ महामार्ग देवांच्या नावाखाली अदानीसारख्या 'महादेवासाठी' (उद्योगपती) केला जात असल्याची टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केली आहे.

वेळापूर येथे आयोजित शक्तीपीठ विरोधी जनआक्रोश मेळाव्यात शेट्टी बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देवदेवतांच्या नावाखाली उद्योगपतींसमोर लोटांगण घालत आहेत. या अनावश्यक महामार्गामुळे जनतेवर १ लाख कोटी रुपयांचा कर्जाचा बोजा टाकत आहेत. महामार्ग हद्दपार केल्याशिवाय जनता स्वस्थ बसणार नाही,असा इशाराही त्यांनी दिला.

शक्तीपीठ महामार्ग माढा तालुक्यातील १२, पंढरपूर तालुक्यातील ६ आणि माळशिरस तालुक्यातील १२ गावांतून जाणार आहे. सध्या या सर्व गावांना कोल्हापूर, सातारा आणि नागपूरला जाण्यासाठी उत्तम पर्यायी रस्ते आहेत.

सुपीक जमिनीतून नवा रस्ता नेण्यास शेतकऱ्यांचा कडाडून विरोध आहे. शेतकऱ्यांनी पालखी महामार्ग आणि रत्नागिरी-नागपूर महामार्गाच्या कामाला कधीही विरोध केला नाही, मात्र शक्तीपीठ महामार्गाचे स्वरूप वेगळे असून त्याच्या टोल वसुलीसाठी किमान ९० वर्षांचा कालावधी लागणार असल्याचा दावा शेट्टी यांनी केला.

'एक्सप्रेस हायवे' स्वरूपाचा महामार्गाला दोन्ही बाजूंनी संरक्षक भिंती असतील. ८०० किलोमीटरच्या या प्रवासात केवळ २३ ठिकाणीच महाम ार्गावर येण्या-जाण्याची सोय असल्याने स्थानिकांसाठी तो कुचकामी आहे. शेतकऱ्यांना मिळणारा मोबदला अत्यल्प आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी हा लढा अधिक तीव्र केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मेळाव्याला जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे, तालुकाध्यक्ष अजित बोरकर, सचिन पाटील, लक्ष्मण मगर, के के. पाटील, सतीश माने-देशमुख, रामचंद्र मगर यांच्यासह शेतकरी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## बार्शीत महाराष्ट्र दिनी जनगणनेला प्रारंभ

### आ. सोपल, माजी आमदार राऊत यांनी केली स्वगणना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ मे**

भारताच्या १६ व्या राष्ट्रीय जनगणनेस महाराष्ट्र दिनी मोठ्या प्रारंभ करण्यात आला. बार्शी शहरातून आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी या जनगणनेत सहभाग घेत शुक्रवारी स्वगणना केली.

यावेळी तहसीलदार एफ. आर. शेख, मुख्याधिकारी तैमूर मुलाणी, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, निवासी नायब तहसीलदार सुभाष बदे, नायब तहसीलदार रवींद्र सानप उपस्थित होते.

तहसील कार्यालयात आमदार दिलीप सोपल यांना स्वगणना करण्यासाठी तहसीलदार



शेख, मुख्याधिकारी मुलाणी, कर अधिकारी विठ्ठल पाटोळे यांनी मार्गदर्शन केले. जनगणनेसाठी शहर व तालुक्यातील सर्वच नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन आमदार सोपल यांनी केले.

माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी देखील स्वगणना केली. तहसीलदार, मुख्याधिकारी यांच्यासह सर्व अधिकाऱ्यांनी देखील स्वगणा केली. नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी केले.

# अकलूज येथे भगवान बुध्दांना अभिवादन

## बुध्द पौणिमा; भगवान बुध्दांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ मे -**

भगवान बुद्ध यांच्या २५७० व्या जयंतीनिमित्त अकलुज येथील सारनाथ बुध्द विहारात परिसरातील हजारो बौध्द अनुयायांनी अभिवादन केले. सायंकाळी अकलूज शहरातुन भगवान बुध्द व बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक काढण्यात आली होती.

अकलूज येथे बौद्ध पौणिमेनिमित्त सारनाथ बुध्द विहार येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमात सकाळी बुध्द वंदना व सुत्तपठण झाले. तदनंतर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, मा.आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, उपनगराध्यक्ष



शिवतेजसिंह मोहिते-पाटील,मुख्याधिकारी सचिन पाटील, नगरसेवक सचिन देशमुख, मोहसीन शेख, मिलिंद कोतमिरे, राहुल लोंढे,विशाल मोरे, नाशिक सोनवणे, प्रियंका गायकवाड, मनिषा तिकोटे, जयश्री एकतपुरे, मृदुला सुर्यवंशी आदींनी तथागताच्या मुर्तीस पुष्पअर्पन करुन केले. उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी माजी सरपंच विठ्ठल गायकवाड, दादासाहेब मोरे, किरण धाईंजे, सुशांत गायकवाड, भारतीय बौध्द महासभाचे दिलीप वाघमारे, बाळासाहेब गायकवाड, नागेश लोंढे, संतोष पाटील, गणपत जाधव, प्रल्हाद गायकवाड, प्रविण लोंढे उपस्थित होते. सायंकाळी अकलूज येथे भगवान बुद्ध व बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. बौध्द पौणिमेनिमित्त खीर व भोजनदान करण्यात आले.

### २५७० मेणबत्या प्रज्वलीत करुन दिपोत्सव

बौध्द पौणिमेनिमित्त भारतीय बौद्ध महासभा सोलापूर जिल्हा पश्चिम विभाग व माळशिरस तालुका शाखेच्या वतीने भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली अकलुज-शंकरनगर येथील संस्थेच्या कार्यालयात कार्यालय परिसरात २५७० मेणबत्या एकाच वेळी प्रज्वलीत करुन दिपोत्सव साजरा करण्यात आला.